# जनसंपर्क अधिकारी कार्यालय, पालघर

**P.R.O. Office,Palghar**

phone no 02525-297032,Mo No 8669604078
Address-sp office Bidco Road,Palghar west
E-Mail- propalghar@gmail.com


## प्रेसनोट क्र. ४६४ दिनांक २२/०५/२०२०

## माणिकपुर पोलीस ठाणेचे कडुन विनापरवाना देशी-विदेशी दारु वाहतुक करणा-या २ आरोपीतांवर कारवाई करुन ०१,९१,८००/- रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त

दिनांक १९/०५/२०२० रोजी दुपारी १३.३० वाजताचे सुमारास माणिकपुर पोलीस ठाणेचे अधिकारी व कर्मचारी पंचवटी वसई प ता.वसई जि.पालघर येथे नाकाबंदी करत असतांना यातील आरोपीत १)आनंत अजय मोदी, वय-३१ वर्षे, व्यवसाय-नोकरी, रा. बोरिवली पुर्व मुबई २) रॉबट विलसन, वय-३८ वर्षे, व्यवसाय-ड्रायव्हर, रा. मालाड पश्चिम यांनी आपले कब्जात विनापरवाना गैरकायदा मादक पेयाच्या आरोपीत क्र १ याने आपल्या ताबेतील एसएक्स-४ कार मध्ये आणि आरोपीत क्र २ याने आपल्या ताबेतील स्विफ्ट डिझायर कार मध्ये देशी विदेशी दारुची वाहतुक करतांना मिळुन आले. आरोपीत यांचे ताब्यातुन १)६,७२०/- रुपये किमतीची दोन बॉक्स मध्ये असलेल्या कार्लबर्ग बिअरच्या ४८ सिलबंद बाटल्या २) ४८०/- रुपये किंमतीची पोर्ट वाईनच्या ०२ सिलबंद बाटल्या, ३) ९,१००/- रुपये किंमतीची ब्लेंडर प्राईडच्या ०७ सिलबंद बाटल्या ४)९०,०००/- रुपये किंमतीची मारुती सुझुकी कंपनीची काळया रंगाची एसएक्स ४ कार ५)२,६००/- रुपये किंमतीची वीके लेमन पंच देशी दारुच्या १०० सिलबंद बाटल्या ६)१,५००/- रुपये किंमतीची एमसी डॉवेल्सच्या १० सिलबंद बाटल्या, ७)१,२६०/- रुपये किंमतीच्या इम्प्रेलिय ब्लुच्या ०९ सिलबंद बाटल्या, ८)१४०/- रुपये किंमतीची ब्लॅक डिएसपीच्या ०१ सिलबंद बॉटल, ९)८०,०००/- रुपये किंमतीची मारुती सुझुकी कंपनीची पांढ-या रंगाची स्विफ्ट डिझायर कार असा एकुण ०१,९१,८००/- रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असुन आरोपीत यांचे विरुध्द माणिकपुर पोलीस ठाणे गु.र.नं. ।।। २०४/२०२० महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम १९४९ चे कलम ६५ (ई) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असुन सदर गुन्हयाचा तपास माणिकपुर पोलीस ठाणे हे करित आहे.

सदरची कारवाई पोलीस निरीक्षक श्री. राजेंद्र कांबळे, माणिकपुर पोलीस ठाणे यांचे मार्गदर्शनाखाली माणिकपुर पोलीस ठाणेचे अधिकारी व कर्मचारी यांनी केली आहे.